म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. १८०८

१८३०

वैदिक ज्ञानाची उपयुक्तता

REFBK-0005565

९८०८.

आर्यसंस्कृति-लेखमाला. लेख ४ था.

# आजच्या व्यवहारांत
# वैदिक ज्ञानाची उपयुक्तता

५५६५

लेखक
श्रीपाद दामोदर सातवळेकर
स्वाध्याय-मंडळ, औंध. ( जि० सातारा )

REFBK-0005565

किंमत १ आणा.

मुद्रक आणि प्रकाशक
श्रीपाद दामोदर सातवळेकर
भारतमुद्रणालय, औंध, ( जि॰सातारा )

नोंद नं. ८८३९
निबंधसंग्रह


आजच्या व्यवहारांत

# वैदिक ज्ञानाची उपयुक्तता

सध्याचा काळ हा शास्त्रीय ज्ञानाच्या प्रगतीचा काळ आहे. या काळामध्ये भोळेपणाने कोणी कांही म्हटलें, तर तें कोणीहि मानणार नाही. इतकेंच नव्हे तर उलट त्याचा उपहास मात्र होईल. अशा स्थितीमध्ये प्राचीनतम कालांत प्रकट झालेल्या वेदांतील ज्ञानाचा अर्वाचीनतम अशा सध्याच्या कालामध्ये कांही उपयोग होईल, असें सहजासहजीं कोणास वाटण्याचा संभव सुद्धा कमीच दिसत असतांहि, **'या वैदिक ज्ञानाचा सध्याच्याहि कालांत आपणांस उपयोग होण्यासारखा आहे'** असें जर कोणी प्रतिपादन करूं लागला, तर त्याच्याकडे विद्वान् लोक आश्चर्यचकित दृष्टीने पाहूं लागतील, यांत संशय नाही.

## पुराणवस्तुसंग्रह

पुराणवस्तूंचा संग्रह करण्याकडे पूर्वीपेक्षा सध्याच्या लोकांचा कल अधिक आहे, यांत शंका नाही. पुराणवस्तूंचा संग्रह करण्यासाठी सरकारने एक मोठें खातें निर्माण केलें आहे व त्याच्या खर्चासाठी पाहिजे तितका जरी खर्च होत नसला, तरी बराच खर्च केला जात आहे, हें सर्वांस माहीत आहे. अशा रीतीने पुराणवस्तुसंग्रह व पुराणवस्तुसंशोधन हें सध्या सर्वमान्य कर्तव्य आहे, असें सर्वांचें मत झालेलें आहे.

शिवाजीच्या वेळचा एखादा अस्सल कागद कोणास सापडला, बादशहांच्या वेळचें एखादें फर्मान कोणाजवळ असलें, एखादा शिलालेखाचा

तुकडा अथवा ताम्रपटाचा भाग कोणास कोठें सापडला, किंवा जमीना खोदताना एखादें जुनें नाणें सापडलें, म्हणजे त्या संशोधकास जी धन्यता वाटते तिचें वर्णन करणें कठीण आहे. जर का या प्राप्त वस्तूंमध्ये शिवाजी महाराजांसारख्या थोर विभूतीचा खरोखर संबंध लावतां आला, तर त्या-वस्तूचें मूल्य पैशांमध्ये सांगणेंहि सध्या कठीण होऊन जातें; इतकें महत्त्व या पुराणवस्तूंचें आहे, हें सध्याच्या वैज्ञानिक युगांतहि सर्वमान्य झालेलें आहे.

हे ताम्रपट व हे शिलालेख हजार दोन हजार वर्षांतले असले तर असतील व हे कागदपत्र फार तर दोन चारशे वर्षांतील असतील; यांचें जर इतिहास-संशोधनाच्या दृष्टीने इतकें महत्त्व मानण्यांत येतें, तर मग त्या मानाने वेदांचें महत्त्व पुरातत्त्वशास्त्राच्या दृष्टीने किंवा प्राचीन इतिहासाच्या दृष्टीने किती आहे, तें सध्याच्या वैज्ञानिक युगांत कोणासहि सांगण्याची आवश्यकता आहे, असें वाटत नाही.

अस्पष्ट शिलालेखांवरील संदिग्धार्थक अक्षरें जितकीं महत्त्वाचीं वाटत असतील, त्यापेक्षा स्पष्टार्थक व वर्णानुपूर्वीने आतापर्यंत जसेच्या तसे सापडत असलेले वेदाचे मंत्र ऐतिहासिक दृष्टीने कमी महत्त्वाचे आहेत, असें म्हण-ण्याचें धाडस कोण बरें सध्या करूं शकेल ? मागचा पुढचा संबंध उमजत नाही, असलीं ऐतिहासिक पत्रें किंवा पत्रावशेष प्राणांपेक्षाहि अधिक जपून ठेवण्याचें कार्य ज्या सध्याच्या कालांत केलें जात आहे, त्याच कालांत प्राचीनतम ऋषींचे हे लेख किंवा त्यांचीं हीं अस्सल पत्रें सध्याच्या कालांत कां बरें महत्त्वाचीं वाटूं नयेत ?

श्रीछत्रपति शिवाजीमहाराज, नानासाहेब पेशवे, नाना फडणीस, इत्यादि थोर पुरुषांचे विचार दोनचारशे वर्षांपूर्वी प्रकट झालेले आपणांस आस्थेने संशोधावे असे वाटतात; पण हजारो वर्षांपूर्वी अगस्ति, गृत्समद, अथर्वा, वसिष्ठ आदि महर्षींच्या द्वारें जे विचार प्रकट झाले, ते अत्यंत प्राचीन असतांहि आमच्याजवळ आज जसेच्या तसे राहिले आहेत; ते ऐतिहासिक

दृष्टया चिकित्सावे असें कां बरें वाटूं नये ? हे हजारो वर्षांपूर्वींचे ऋषींचे विचार जवळ जवळ जसेच्या तसेच आपणांस आज सापडत आहेत. त्यांतील कांही कागदपत्र हरवले आहेत असें कात्यायनादि प्राचीन संशोधक सांगत आहेत हें खरें; पण जे कांही ऋषींचे कांही कागदपत्र सापडत आहेत, ते जसेच्या तसे ब्राह्मणांनी आपल्या जिवाच्या मोलाने आजपर्यंत रक्षण करून ठेवलेले आहेत, हे या संरक्षकांचे आम्हांवर अनंत उपकार आहेत; पण ज्या आस्थेने त्यांची जपणूक केली, त्याच आस्थेने त्यांचें संशोधन व्हावयास नको काय ?

तीनशे वर्षांपूर्वी झालेल्या शिवाजीचें पत्र सापडूं नये, पण दहा हजार वर्षांपूर्वी झालेल्या वसिष्ठाचा विश्वामित्राशीं झालेला संवाद जशाचा तसा ऱ्हस्वदीर्घांचाहि फरक न होतां आज आपणांस सापडावा, हा चमत्कार नाही काय ? हे कागदपत्र इतक्या काळजीने ब्राह्मणांनी हजारो वर्षे जे जपून ठेवले ते उगीच,असें सध्याच्या विज्ञानयुगांत तरी कोणालाहि सहजासहजीं म्हणतां येणार नाही. पण आमचे कांही बन्धु सध्या असें म्हणत असतात, हें हि कांही खोटें नव्हे.

म्हणून आज येथे इतकेंच म्हणावयाचें आहे की, जितका ऐतिहासिक कागदपत्रांचा आपणास उपयोग होणें शक्य आहे, त्याहीपेक्षा अधिक उपयोग वैदिक मंत्रांच्या ज्ञानाचा होणें शक्य आहे; फक्त त्याचा अधिक आस्थेने, अधिक बारकाईने व अधिक काळजीने अभ्यास करण्यासाठी विद्वानांनी पुढे आलें पाहिजे.

कांही विचारकांच्या मतांप्रमाणे ऋषि हे मंत्रांचे कर्ते नसून द्रष्टे आहेत. अर्थात् ऋषींच्याही पूर्वीच्या कालापासून वेद आलेले आहेत; ते त्यांनी तपोबलाने शोधून काढले किंवा त्यांस ते स्फुरित झाले. पूर्वी असलेले मंत्रच संशोधक ऋषींनी पाहून व शोधून एकत्र व संग्रहित केले. या मताचा विचार आज आपणांस येथे करावयाचा नाही. आज आपल्या विचाराची मर्यादा

एवढीच आहे की, ऋषींच्या नांवावर जीं सूक्तें आज सापडत आहेत, तीं त्या त्या ऋषीच्या कालापासून तरी त्या त्या नांवावरच आहेत. तेव्हा तीं तेव्हा-पासून तरी त्या नांवांवर आहेत असें धरून आपण चालूं व त्यांची अर्थाच्या दृष्टीने संगति लाऊन पाहूं व त्यांत काय काय ज्ञान सापडत आहे, तें घेऊन त्याचा उपयोग करूं.

सध्या पुष्कळच लोक युरोपियन लोकांनी चालविलेलें वैदिक संशोधन पडताळून न पाहतां, तेंच सर्वथा प्रमाण मानून, त्यांनी प्रतिपादन केलेले सिद्धान्तच पुरस्कारीत असतात. परवा एका महाराष्ट्रीय विद्वानाने एक लेख प्रकाशित करून असें प्रतिपादन केलें की '**यज्ञासंबंधाने युरोपियन पंडितांना अज्ञात असें कांही नाही.**' खरें म्हटलें असतां वेदांच्या संशोधनाचें शिस्तवार साहित्य-मुद्रण नुकतेंच कोठे प्रकाशित होऊं लागलें आहे. अजून खऱ्या संशोधनास प्रारंभ व्हावयाचा आहे. इतक्यांतच हे लोक युरोपियनांनी सर्व संशोधन करून सोडलें आहे व आता पुढे आम्हांस संशोधावयाचें असें कांही राहिलेलें नाही, असें म्हणूं लागले आहेत, हें आश्चर्य आहे !!!

पूर्वग्रह सोडून वेदांचें संशोधन केलें असतां, जसे युरोपियन लोकांस त्यांचे कांही प्रस्थापित सिद्धांत सोडावे लागतील, त्याचप्रमाणे आम्हांसहि सोडणें भाग पडेल, अशी खरी वस्तुस्थिति आहे. म्हणून आस्थेवाईक संशोध-कांनी या बाबतींत परिश्रम करण्यास पुढे आलें पाहिजे.

## वेद हा विश्वकोश आहे.

ज्याप्रमाणे सध्यांच्या काळांत अनेक प्रकारचे '**विश्वकोश**' प्रकाशित होत आहेत व ज्याप्रमाणे **महाभारत व अग्निपुराण** हे पौराणिक कालांतील विश्वकोश होते, त्याचप्रमाणे **ऋषिकालांतील प्रचंड विश्वकोश म्हणजेच वेद** होत. यांस '**वेदराशी**' असें म्हणतात, त्याचा हेतु हाच आहे.

ति ७८०८



वेदराशी म्हणजे ' **ज्ञानाची रास** ' होय. याचेंच नांव **ज्ञानाचा 'कोश'** होय किंवा ज्ञानाचें **भाण्डार** होय.

ज्ञानकोश या दृष्टीने वेदांचें संशोधन अजून व्हावयाचें आहे. पुष्कळांनी तीं यज्ञकर्माचीं पुस्तकें आहेत असें समजून, त्यांचा अभ्यास मंत्रांच्या सहाय्याने न करतां सूत्रग्रंथांच्या सहाय्याने चालविला आहे, कित्येकांनी तीं फक्त पाठ करावयाचीं पुस्तकें आहेत असें मानलें आहे; कित्येकांनी त्यांस बालमानव-समाजाचे ते बोबडे बोल असें समजून त्याचें निरीक्षण केलें आहे. हें सर्व निरीक्षण पूर्णतया खरें नव्हे. वेदमंत्रांचा अर्थ अगदी वेदमंत्रांतील अन्तर्गत प्रमाणांनी तपासून पाहून त्यांचें संशोधन करावयास पाहिजे आहे व तें करीत असतां सर्व पूर्वग्रह एका बाजूस सारले पाहिजेत. तरच ऋषींच्या कालांतील ऋषींचें हृद्गत आपणांस समजणें शक्य होईल.

' **वेद हा ऋषिकालांतील विश्वकोश** ' असल्यामुळे त्यांत अनेक प्रकारच्या त्या त्या कालांतील विद्या असण्याचा संभव आहे. त्या सर्व विद्यांचें दिग्दर्शन आजच्या प्रसंगीं करावयाचें नसून फक्त एकाच विषयाचें अंशतः दिग्दर्शन करून वैदिक ज्ञान हें सध्याच्या कालींहि कसें उपयोगी पडण्यासारखें आहे, तें संक्षेपानें दाखवावयाचें आहे. आजच्यापुरता या विषयाचा भाग—

## ' वैदिक कालचें राष्ट्रीय जीवन '

हा निवडला आहे. कारण आज या विषयाची चहूंकडे विशेष चर्चा चाललेली आहे. त्या चर्चेंत या विषयाची वैदिक कालांतील माहिती लोकांस समजली, तर ऋषि लोक हे राष्ट्रविषयक प्रश्न कसे सोडवीत होते, तें सहज समजून येईल. राष्ट्रीय जीवन वैदिक काळीं कसें होतें, त्याचा विचार करीत असतांना पुढील मंत्र प्रथम दृष्टीसमोर येऊन उभा राहतो—

## सभा व सभापति

**धर्माय सभाचरं ।** ( वा० यजु० ३०।६ )

" राष्ट्रधर्माचें ज्ञान प्राप्त करावयाचें असेल तर राष्ट्रसभेच्या सभासदांना भेटावें व त्यांच्याशीं त्यासंबंधाने विचारविनिमय करावा. " ही यजुर्वेदाची श्रुती आहे. येथील ' **सभाचर** ' शब्द फार महत्त्वाचा आहे. ' **सभा** ' म्हणून कांही संस्था असते, त्या संस्थेंत येऊन हालचाल किंवा कार्यव्यवहार करणारे कांही सदस्य असतात. इतरांना त्या सभेचें सदस्यत्व नसतें व या सभासदांना राष्ट्राच्या शासन-व्यवहारधर्माचें ज्ञान असतें व तें ज्ञान त्यांच्याकडून इतरांस मिळणें शक्य असतें. इतके विचार या मंत्रखंडावरून सहज ध्यानीं येतात. तसेंच—

**नमः सभाभ्यः सभापतिभ्यश्च वो नमः ।** (वा० यजु०)

' सभा व सभाध्यक्ष यांना नमस्कार असो. ' या मंत्रभागावरून सभा, सभासद व त्यांचे अध्यक्ष हे सन्मान्य व नमस्कारार्ह होते असें दिसतें. सभा अनेक असत, असेंहि ' **सभाभ्यः** ' या बहुवचनी प्रयोगावरून दिसतें. या अनेक सभा कोणत्या, तें पुढील मंत्रांत सांगितलें आहे. ते मंत्र पहा—

**विराड् वा इदमग्र आसीत्, तस्या जाताया सर्वमबिभेत्,**
**इयमेवेदं भविष्यतीति ॥ १ ॥**
**सोदक्रामत्सा सभायां न्यक्रामत् ॥ ८ ॥**
**यन्त्यस्य सभां सभ्यो भवति य एवं वेद ॥ ९ ॥**
**सोदक्रामत्सा समितौ न्यक्रामत् ॥ १० ॥**
**यन्त्यस्य समितिं सामित्यो भवति य एवं वेद ॥ ११ ॥**
**सोदक्रामत्सामन्त्रणे न्यक्रामत् ॥ १२ ॥**
**यन्त्यस्यामंत्रणं, आमंत्रणीयो भवति य एवं वेद ॥ १३ ॥**

(अथर्ववेद ८।१०)

“ **विराज्** ( वि–राज् )” म्हणजे प्रारंभीं असलेली जनतेची राजविहीन स्थिति. तीच स्थिति नेहमी राहील असें लोकांस वाटून त्यांस फार भय वाटलें. नंतर ती राजाशिवाय असलेली जनतेंतील प्रजाशक्ति उत्क्रमण पावली व **ग्रामसभे**मध्ये परिणत झाली. नंतर ती पुनः उत्क्रमण पावून **राष्ट्रसमिती**मध्ये परिणत झाली. यापुढे ती आणखी उत्क्रमण पाऊन **आमन्त्रणपरिषद्**मध्ये परिणत झाली.”

या सभांचा हा इतिहास मनन करण्यासारखा आहे. लोक आहेत, पण राजा नाही, अशी आरंभी स्थिति होती. नंतर एके ठिकाणीं वसणाऱ्या लोकांनी आपली एक ‘ **ग्रामसभा** ’ बनवली. ग्रामसभा हा या दृष्टीने राज्य-शासनाचा प्रारंभींचा मूल घटक आहे. या वेळीं या ग्रामसभेच्या द्वारें गावाचें कामधाम होऊं लागलें.

हाच संघटनेचा प्रारंभींचा घटक होय. येथे ग्रामसंघटनेस प्रारंभ झाला आहे. हीच संघटनेची बुद्धि वाढून अशा अनेक ग्रामसभांतून एक ‘ **राष्ट्र-समिति** ’ राष्ट्राचें नियमन करण्यासाठी निर्माण झाली व राष्ट्राचें नियमन या राष्ट्रसमीतीकडून होऊं लागलें. इतकें झालें तरी गावांची व्यवस्था पाहण्या-साठी ग्रामसभा किंवा गावपंचायत होतीच. अशा रीतीने या वेळीं दोन सभा एका राष्ट्रांत कार्य करीत असलेल्या दिसत आहेत; पण त्या दोनही सभांच्या कार्यक्षेत्रांची व्याप्ती मात्र निरनिराळी आहे.

ग्रामसभेचें काम झालें तरी सर्व सभासदांनी मिळून करावयाचें व राष्ट्र-समितीचें कामही तसेंच सर्व सभासदांनी मिळून करावयाचें असतें. हे सर्व सभासद जमणें व त्यांचें एकमत होणें, हें कठीण असतें. यासाठी सभेच्या अवजडपणामुळे राष्ट्राचें काम थटूं नये, म्हणून लहानशी एक आटोपशीर राष्ट्रनियामक संस्था बनणें आवश्यक होतें. तीच राष्ट्रसमितींतून उत्क्रान्त पाऊन बनलेली ‘ **आमंत्रण–संस्था** ’ होय. याच संस्थेला ‘ **मंत्रिमंडल** ’ असें सध्या म्हणतात. यांत फरक इतकाच की, मंत्रिमंडलाने राजाला सल्ला

द्यावयाची असते व ' **आमंत्रण** ' परिषदेने स्वतःच कारभार पहावयाचा असतो. एवढा या दोहोंमध्ये फरक आहे.

असो. याप्रमाणे ज्या अनेक म्हणजे निदान तीन तरी सभा असाव्या असें आपण ' **सभाभ्यः** ' या बहुवचनी प्रयोगावरून ताडलें, त्या तीन सभाही आपणांस येथे सापडल्या व या तीन लहानमोठ्या विभिन्न क्षेत्रांत कार्य करणाऱ्या असल्यामुळे त्या निरनिराळया तीन संस्था आहेत, अर्थात् एकीचें कार्य दुसरीकडून भागावयाचें नाही, अशा त्या विभिन्न आहेत, इतकें यावरून ठरलें. म्हणूनच '**सभाभ्यः**' असें विभिन्न तीन सभा आहेत असें दाखवण्यासाठी बहुवचनी प्रयोग योजून म्हटलेलें असावें, असें म्हटलें तर तें अयोग्य होणार नाही.

या सभांचे **सभापति**ही निदान तीन तरी असले पाहिजेत, असें ' **सभापतिभ्यः** ' या बहुवचनी प्रयोगावरून म्हणावें लागतें. ' **अध्यक्ष, उपाध्यक्ष** ' हे दोघे तर सभांना नियामक म्हणून असतातच. यांचीच ' **इन्द्र**' व '**उपेन्द्र**' हीं फार प्राचीन काळचीं नांवें होत. यांपैकी अध्यक्ष एकच असतो, पण उपाध्यक्ष मात्र दोन किंवा अधिक असणें शक्य आहे. या दृष्टीने पाहून ' **सभापतिभ्यः** ' या पदाच्या बहुवचनी प्रयोगांतील भाव समजून घेणें अगत्याचें आहे. वैदिक काळीं जशा या सभा अनेक असत, तसेच सभांचे अध्यक्षहि अनेक असत. ही गोष्ट आपणांस या मंत्रांच्या विचाराने समजली.

## सभासदांची निवडणूक.

या सभांच्या सभासदांची निवडणूक कशी करावयाची, त्याचाही विचार केला पाहिजे. गावांतील रहिवाशांनी आपणांपैकी योग्य माणसांना निवडून देऊन त्या निवडलेल्यांची ग्रामसभा होत असावी असें दिसतें. गावाशीं हितसंबंध असलेल्या कायम रहिवाशांची ही ग्रामसभा होत असावी, असें दिसतें; कारण 'जनतेंतील विस्कळीत शक्ति ( **उदक्रामत्** ) उत्क्रान्त पाऊन केन्द्रित

नों. नं. ७५४१

नि. नं. निबंध - च

झाली व ( **सभायां न्यक्रामत्** ) सभेमध्ये परिणत पावली ' असें वर स्पष्ट म्हटलें आहे. याचा अर्थ गावकरी लोकांचीच शक्ति सभेच्या रूपाने प्रकट झाली, असा स्पष्ट आहे. अर्थात् गावकऱ्यांनी आपल्यापैकी कांही लोकांस निवडून दिलें व त्यांची ग्रामसभा बनवली असें उघड आहे.

या पुढे 'तीच जनतेंतील शक्ति अधिक ( **उदक्रामत्** ) उन्नत झाली व ( **समितौ न्यक्रामत्** ) समितीमध्ये परिणत झाली ' असें म्हटलें आहे. यावरून ग्रामसभांकडून राष्ट्रसमितीची निवडणूक होत होती, असें दिसतें. प्रत्येक ग्रामसभेने किंवा अनेक ग्रामसभांच्या गटाने आपले प्रतिनिधि राष्ट्रीय महासमितीमध्ये पाठवावे व त्या राष्ट्रसमितीने राष्ट्रीय सभेचें कार्य संभाळावें, असा वैदिक काळचा राजव्यवहार दिसत आहे. हा राष्ट्रीय सभेच्या निवडणुकीचा विधि आहे.

या राष्ट्र-समितीनेच आपलें मंत्रिमंडल निवडावयाचें आहे व आपल्या सभेचे अध्यक्ष उपाध्यक्षहि त्या त्या सभेनेच निवडून द्यावयाचे आहेत.

**ग्रामसभा, राष्ट्रसमिति व मंत्रिमंडल** यांची निवडणूक व कार्य-व्याप्ती ही अशी दिसते. सध्या याला अप्रत्यक्ष निवडणूक ( Indirect Ellection ) असें म्हणतात. ही निवडणूक कमी खर्चाची व कमी दगदगीची असते. प्रत्यक्ष निवडणूक ही अत्यंत खर्चाची असल्यामुळे पैशाचें पाठबळ असल्यावाचून प्रत्यक्ष निवडणुकींत चांगलीं माणसें निवडून येणें शक्य नसतें. पण अप्रत्यक्ष निवडणुकीमध्ये खर्चाचा फारसा प्रश्न नसतो व प्रत्येक सभांमधून चाळून वर जाणारीं माणसें बहुधा चांगलींच जात असतात. प्रत्यक्ष निवडणुकींत एक लाभ आहे व अप्रत्यक्ष निवडणुकीमध्ये दुसरे कांही लाभ आहेत. अगदी निर्दोष अशी कांही पद्धति अजून सापडलेली नाही; पण वेदांच्या काळीं अप्रत्यक्ष निवडणुकी असाव्या, असें वरील मंत्रभागावरून दिसतें.

❀

## सदस्यांची योग्यता.

वर तीन प्रकारच्या सभा सांगितल्या, त्यांपैकी ग्रामसभेच्या सभासदाला '**सभ्य**', राष्ट्रसमितीच्या सभासदाला '**सामित्य**' व मंत्रिमंडलाच्या सभासदाला '**आमंत्रणीय**' अशीं नांवें होतीं. **सभ्य** म्हणजे ग्रामसभेचा सभासद, '**सामित्य**' म्ह० राष्ट्रसमितीचा सभासद व '**आमंत्रणीय**' म्ह० मंत्रिमंडलाचा सभासद होय. या सभांमध्ये कशा प्रकारचे सभासद नेमले किंवा निवडले जावे, यासंबंधाने जरी फारशी माहिती उपलब्ध नसली, तरी एक मंत्र कांही संदिग्धशी माहिती देत आहे. तो मंत्र असा—

**आ यद्वामीयचक्षसा मित्र वयं च सूरयः ।**
**व्यचिष्ठे बहुपाय्ये यतेमहि स्वराज्ये ॥**

( ऋ० ५।६६।६ )

"( **ईयचक्षस**) व्यापक दृष्टीचे, ( मित्र ) जनतेचे स्नेही व ( **सूरयः** ) आम्ही ज्ञानी विद्वान् या तिघांनी मिळून (**व्यचिष्ठे बहुपाय्ये स्वराज्ये आ यतेमहि** ) विस्तृत व पुष्कळांनी पालन केलें जातें, असल्या स्वराज्यामध्ये सर्वांच्या उन्नतीसाठी यत्न करावा"

या स्वराज्यामध्ये या तीन प्रकारच्या लोकांना सभासदत्वाचा अधिकार होता, असें दिसतें. यांतील—

**(१) सूरि—** हा शब्द ज्ञानी, पंडित, विद्वान्, विद्यापारंगत अशा अर्थी प्रसिद्ध आहे. '**मल्लिनाथसूरि**' असे प्रयोग त्यांतील कृतविद्यत्वाचा आशय स्पष्टपणाने दाखवीत आहेत. म्हणून या शब्दाने विद्येची लायखी दाखवली जाते, असें म्हणतां येतें.

**(२) मित्र**-हा शब्द हितकर्ता, प्रत्यक्ष सहायक, स्नेही, सहृदय हितकर्ता अशा अर्थाचा वाचक आहे. जनतेचें प्रत्यक्ष हित करण्यासाठी आपणांस

सं. ........ ता. ........

वाहून घेणारा जो असेल, तो या सभांचा सदस्य होण्यास योग्य समजावा, असें हा शब्द सुचवीत आहे.

(३) **ईयचक्षस्**–हा शब्द विस्तृत दृष्टीचा वाचक आहे. आपल्यापुरतें किंवा आपल्या जातीपुरतें पाहण्याची ती संकुचित दृष्टि होय व सार्वजनिक हिताची दृष्टि ही व्यापक दृष्टि होय. आपल्या जातीपुरतें पाहण्याची दृष्टि संकुचित दृष्टि असून सर्व जातींचें मिळून सांघिक हित पाहण्याची दृष्टि ती विस्तृत दृष्टि होय. अशा विस्तृत दृष्टीच्या लोकांना या सभांचे सदस्य निवडून द्यावें.

या तीन प्रकारच्या सदस्यांनी मिळून या गावाच्या किंवा राष्ट्राच्या स्वराज्यामध्ये सर्व जनतेच्या उद्धारासाठी कार्य करावयाचें आहे, हा भाव **'बहुपाय्ये स्वराज्ये आ यतेमहि'** (बहुतांकडून पालन होणाऱ्या स्वराज्यांत सर्वांच्या उन्नतीसाठी यत्न करूंया) या मंत्रभागामध्ये अगदी स्पष्ट आहे.

सदस्यांच्या या योग्यतेमध्ये '**सूरि**' शब्दाने विद्येची योग्यता दाखवली जाते. सध्याच्या एम्. ए. सारखीच '**सूरि**' ही पदवी विशेष विद्वत्तेची सूचक आहे. टीकाकार, भाष्यकार अशा थोर विद्वानालाच ही पदवी मिळत असे. या प्रकारचे विद्वान् गावसभेचे व राष्ट्रसभेचे सभासद व्हावे, हें योग्यच आहे.

'**मित्रकृति**' व '**विस्तृतदृष्टी**'चे लोक मात्र कसे निवडावे, हा प्रश्न सहज सुटणारा नाही. **प्रत्यक्ष लोकसेवेचें काम करणारे ते मित्रकृति करणारे लोक आहेत, असें समजण्यास हरकत नाही.** लोकांना असे लोक आपल्या गावांत अमूक आहेत असें समजणेंही शक्य आहे, म्हणून अशा लोकांना जनता निवडून देईलच. विस्तृत दृष्टीचीहि अशीच कसोटी समजावी लागणार. जे लोक आपल्याच जातीपुरतें किंवा आपल्याच कुटुंबापुरतें न पाहतां, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सर्व बाबींचा विचार करतात, त्यांस विस्तृत दृष्टीचे लोक म्हणावयास हरकत नाही. लोकांना असे

लोक कोण आहेत, हें समजणें शक्य आहे व निवडावयाच्या वेळीं जनता अशाच लोकांस निवडून देईल, हेंहि शक्य आहे.

पण अमूक मनुष्य हा '**सूरि**' आहे कीं नाही, तें त्याच्या पदवीवरून जसें समजलें जाणें शक्य आहे, त्याचप्रमाणे अमूक मनुष्य हा '**मित्रकृति**' करणारा आहे कीं '**विस्तृतदृष्टी**' चा आहे, हें कायद्याच्या कोर्टांत ठरणें कठीण आहे. म्हणून या परीक्षेवर निवडणुकी लढवणें आम्हांस माहीत असलेल्या निवडणुकीच्या पद्धतीने कठीण आहे. पण वैदिक काळांत जेव्हा कलिपुरुषांचा भरणा कमी होता असेल, त्या वेळीं त्याच्या एकंदर वर्तणुकीचा विचार करून त्यांची निवडणूक होत असेल असें दिसतें. असो. वेदाच्या काळीं '**बहुपाय्य स्वराज्या**' मध्ये कोणत्या माणसाला राष्ट्रसभेचे सभासद होतां येत असे, तें या मंत्रावरून आपणांस साधारणपणें समजलें. यापेक्षा अधिक माहिती आणखी इतर मंत्रांत शोधावयास पाहिजे आहे.

याच मंत्रांत '**स्वराज्य**' शब्दाचीं विशेषणें '**व्यचिष्ठ**' व '**बहुपाय्य**' हीं आहेत. हीं फारच महत्त्वाचीं आहेत. त्यांत '**बहुपाय्य**' शब्दाने बहुसंमतीने सभेचें काम चालावें, राज्याचें शासन बहुसंमतीने बहुपक्षाच्या मंत्रिमंडलाकडून चालावें असें म्हणण्यास प्रत्यवाय नाही. '**व्यचिष्ठ**' शब्दाने व्यापक व सर्वांला घेऊन व्यापून राहणारें हें स्वराज्य-शासन आहे, असें ठरत आहे. '**व्यचिष्ठ**' म्हणजे व्यापक, सर्वांस व्यापून राहणारें, सर्वांवर ज्याची सत्ता चालते तें. स्वराज्याचीं हीं दोन विशेषणें त्याच्या स्वरूपाची नक्की कल्पना या ऋषीस आली होती, असें दाखवीत आहेत. ज्या स्वराज्यांत ( **बहु-पाय्य** ) बहुतांच्या बहुसंमतीने राज्यशासन चालतें व ज्या शासनाची व्याप्ती ( **व्यचिष्ठ** ) व्यापक व विस्तृत आहे व जें शासन ( **सूरि** ) विद्वान् ज्ञानसंपन्न लोकांनी चालवावयाचें आहे, त्या स्वराज्यामध्ये ( **यतेमहि** ) आम्ही सर्वांनी मिळून आपल्या सर्वांच्या उन्नतीसाठी यत्न करावयास पाहिजे, हे शब्द स्वराज्यविषयक रूपरेखा नक्की झाल्यावाचून बोलले जाणें अशक्य आहे, हें कोणासहि निराळें सांगण्याची आवश्यकता नाही.

## चळवळीची दिशा.

ह्या बहुपाय्य स्वराज्यविषयक मंत्र अत्रीच्या कुळांत उत्पन्न झालेल्या रातहव्य ऋषीचा आहे. अत्रीचें कुळ हें स्वराज्यविषयक चळवळीसाठी वेदांमध्ये फारच प्रसिद्ध आहे. पहा—

**अत्रिमनु स्वराज्यमग्निं उक्थानि वावृधुः।**
**विश्वा अधि श्रियो दधे ॥** (ऋ० ५।८।५)

'स्वराज्याला अनुलक्षून कार्य करणाऱ्या अग्नीसारख्या तेजस्वी अत्रीची प्रशंसा अनेक सूक्तांमध्ये केलेली आहे; कारण सर्व प्रकारचीं धनें त्याच्या आश्रयाने रहात असतात.' अशा अर्थाचा एक मंत्र आहे. या मंत्रांत स्वराज्या-साठी अत्रि ऋषीचे फार मोठे प्रयत्न पूर्वकालीं झाले होते, असें स्पष्ट म्हटलें आहे. हे प्रयत्न कोणत्या स्वरूपाचें होते तेंहि येथे पाहण्यासारखें आहे. त्या-साठी पुढील एक दोन मंत्र पाहावे.—

**ऋषिं नरावंहसः पांचजन्यं**
**ऋबीसादत्रिं मुंचथो गणेन।**
**मिनंता दस्योः अशिवस्य माया**
**अनुपूर्वं वृषणा चोदयन्ता ॥** (ऋ० १।११७।३)

**हिमेनाग्निं घ्रंसमवारयेथां**
**पितुमतीमूर्जमस्मा अधत्तम्।**
**ऋबीसे अत्रिमश्विनावधत्तं**
**उन्निन्यथुः सर्वगणं स्वस्ति ॥** (ऋ० १।११६।८)

सायणभाष्य— पांचजन्यं निषादपंचमाश्चत्वारो वर्णाः पंचजनाः। तेषु भवं। सर्वेषां हिताचरणात्तत्रभव इत्युच्यते। तादृशं ऋषिं अंहसः ... ऋबीसात् शतद्वारे यंत्रगृहे अत्रेः पीडार्थं असुरैः प्रक्षिप्तात्तुषाग्नेः सकाशात् गणेन सह मुंचथः॥ (ऋ० सा० भा० १।११७।३)

**अत्रिं ऋषिं असुराः शतद्वारे पीडयन् यंत्रगृहे प्रवेश्य तुषाग्निनाऽबाधिषत। ... अस्मै असुरपीडया कार्श्यं प्राप्ताय अत्रये पितुमतीं ... अन्नयुक्तं ऊर्जं बलप्रदं रसात्मकं क्षीरादिकं अधत्तं पुष्ट्यर्थं प्रायच्छतं। ऋबीसे अपगतप्रकाशे पीडायंत्रगृहे अवनीतं अवाङ्मुखतयाऽसुरैः प्रापितं अत्रिं सर्वगणं गणः समूहः। ... तेन उपेतं। स्वस्ति अविनाशो यथा भवति तथा उन्निन्यतुः। तस्माद् गृहादुद्गमय्य युवां स्वगृहं प्रापितवन्तौ ॥**

**(ऋ० सा० भा० १।११६।८)**

" फार प्राचीन काळीं ( **अत्रिः** ) अत्रि ऋषि ( **गणेन सह** ) आपल्या अनुयायीवर्गासह स्वराज्यप्राप्तीची चळवळ करीत होते. अत्रि ऋषि व त्यांचे सर्व अनुयायी हे (पांचजन्य) पांचही प्रकारच्या म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व निषाद या सर्व लोकांच्या कल्याणासाठी अहर्निश झटत होते, म्हणून ते सर्व लोकांस अत्यंत प्रिय झालेले होते. हे ऋषि ब्राह्मणक्षत्रियांचेंच हित पहात होते असें नसून शूद्र व निषाद यांचेंहि हित करण्यासाठी जिवापाड मेहनत करीत होते. म्हणून सर्व लोकांचें मन त्यांच्यावर बसलेलें होतें. या अत्रि ऋषिला ( **अशिवस्य दस्योः माया** ) अकल्याण करणाऱ्या शत्रूचें कपटजाल कसें घातक आहे, तें उत्तम प्रकारें समजलें होतें, म्हणून ते त्यांच्या विरुद्ध योग्य चळवळ करीत होते. अत्रि ऋषींच्या या चळवळीची बाधा असुरराजांना झाली व त्यांनी अत्रि ऋषिला त्यांच्या अनुयायांसह (**यंत्रगृहे**) तुरुंगांत टाकलें. अत्रीच्या शेकडो अनुयायांनी तुरुंग भरून गेले. या स्वराज्यासाठी चळवळ करणाऱ्या ऋषींना अत्यंत त्रास व्हावा, यासाठी या सर्वांस (**ऋबीसे**) अंधारकोठडींत कोंडलें होतें व आंत धूर सोडला होता, तसेंच या कोठड्यांत नीटपणाने उभे राहण्यास किंवा निजण्या-बसण्यास भरपूर जागाही नव्हती. यामुळे स्वराज्यासाठी खटपट करणारे ऋषिगण फारच त्रस्त झाले. सर्व लोक तुरुंगांतील हालअपेष्टांनी अत्यंत अशक्त झाले होते. पुढे चळवळ फारच वाढली, तेव्हा तुरुंगांतून यांस सोडण्यांत आलें; त्या वेळीं त्या काळच्या वैद्यांनी-

अश्विनीकुमारांनी- त्यांस थोडें थोडें **( पितुमतीं ऊर्जं )** सहज पचणारें व अत्यंत पौष्टिक असें अन्न देऊन पुनः ताजे तवानें केलें. "

हा अत्रिऋषीच्या स्वराज्याच्या चळवळीचा इतिहास वरील दोन मंत्रांत व त्यावरील सायन-भाष्यांत स्पष्ट शब्दांत सांगितला आहे. असुर राजाविरुद्ध ही अत्रीची स्वराज्यविषयक चळवळ फार प्राचीन काळची असल्यामुळे ऐतिहासिक दृष्टीने ही फारच बहुमोल आहे. ऋषींनी स्वराज्यासाठी काय काय श्रम केले, हें यावरून ध्यानीं येतें.

या वैदिक इतिहासावरून ऋषि लोक स्वराज्यस्थापनेसाठी चळवळ करीत असत, त्यांचे अनुयायी बरेच होते, चळवळीची धग राजकर्त्यांस लागली होती, म्हणून राजकर्त्यांनी चळवळ्या ऋषींस पकडून तुरुंगांत हालअपेष्टेंत ठेविलें होतें. या कष्टांना न जुमानतां ऋषींनी आपली चळवळ जोरांत चालविली व शेवटीं स्वराज्य प्राप्त करून घेतलें.

## पांचजन्य म्ह० लोकमान्य

ही ऋषींची चळवळ केवळ वरिष्ठ जातींसाठीच नव्हती, तर त्यांचें **ध्येय सर्व जनतेस-वरिष्ठ व कनिष्ठ अशा सर्व जातींस सुख मिळावें.** हें होतें. अशी सर्व जनतेच्या हिताची चळवळ करणारास वैदिक काळचा बहुमानाचा शब्द '**पांच-जन्य**' हा आपणांस येथे आढळला. सध्या '**पांचजन्य**' शब्दाचा अगदीच उपहासास्पद अर्थ झालेला आहे; पण वेदांमध्ये हा शब्द फारच सन्मानार्थक आहे. सायणाचार्य आपल्या भाष्यांत-

**पांचजन्यं निषादपंचमाश्चत्वारो वर्णा पंचजनाः तेषु भवं ।**
**सर्वेषां हिताचरणात्तत्रभव इत्युच्यते तादृशं ऋषिं ।**

स्पृश्यास्पृश्य अशा सर्व जातींच्या लोकांचें हित करणाराला '**पांचजन्य**' असें सन्मानाने म्हणतात, असा अर्थ भाष्यकार देतात. सर्व जनतेचें हित करणारा, सर्व जनांना जो अत्यंत प्रिय, अत्यंत थोर वाटतो, सर्व लोकांना

जो आदरणीय वाटतो तो '**पांचजन्य**' होय ( sage honoured by five tribes ).

ज्या मित्रदृष्टीच्या लोकांनी स्वराज्याच्या राष्ट्रपरिषदेमध्ये कार्य करावें असें वरील मंत्रांत सांगितलें आहे, ती '**मित्रवृत्ति**' म्हणजे काय, तें या '**पांचजन्य**' शब्दाने येथे दाखविलें आहे. सर्व लोकांच्या हितासाठी वाहून घेतल्यामुळे पंचजनांची पूज्यबुद्धि ज्याला लाभली आहे, त्यालाच लोकांचा '**मित्र**' असें म्हटलें जातें व तोच स्वराज्याच्या राष्ट्रसभेमध्ये लोकांनी निवडून देण्यास योग्य होय, यांत शंका नाही.

## पांचजन्याचा घोष.

सध्या '**पांचजन्य**' केला असें कोणी म्हणतांच त्याने शंख केला असें समजलें जातें. पण वैदिक काळीं '**पांचजन्याचा घोष**' याचा अर्थ निराळा होत असे. या पांचजन्याच्या घोषाचा अर्थ 'ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य-शूद्र व निषाद या पंचजनांच्या मताचा घोष' असा अर्थ आहे. आजच्यासारखी दुफळी त्या वेळीं या पंचजनामध्ये नसावी, असें यावरून दिसतें.

पंचजनांनी एकमताने जर आपल्या मताचा घोष केला, तर त्याचा प्रभाव झालाच पाहिजे. हें मत पुढील मंत्रांत पहा—

**यत्पांचजन्यया विशेन्द्रे घोषा असृक्षत ।** ( ऋ० ८।६३।७ )

"( **पांचजन्यया विशा** ) पांच प्रकारच्या जातीच्या प्रजाजनांनी जेव्हा ( **इन्द्रे** ) राजाजवळ ( **घोषा असृक्षत** ) आपला" घोष पाठवला. याचें भाषान्तर म. ग्रिफिथ साहेब असें करतात- When the five tribes with their men have sent out their voice to Indra. यांतहि 'पांच जातीच्या लोकांनी मिळून आपलें म्हणणें राजाकडे पाठवणें' हाच भाव आहे. यावरून '**पांचजन्य-घोष**' शब्दाचा वैदिक अर्थ ( Public Voice ) सार्वजनिक मताची घोषणा अशासारखा आहे, हें लक्ष्यांत येईल.

वैदिक काळचे ऋषि हे नुसते ध्यानधारणा करीत व पर्णकुटिकेंत बसत असा जो समज सध्या प्रचलित आहे, तो हे मंत्र पाहून बाजूस सारावा लागेल व तेहि राष्ट्रीय चळवळींत भाग घेत असत, असें यावरून स्पष्ट म्हणणें प्राप्त होईल. हाच आशय पुढील मंत्रांत स्पष्ट आहे–

**भद्रमिच्छन्त ऋषयः स्वर्विदः तपोदीक्षामुपसेदुरग्रे ।**
**ततो राष्ट्रं बलमोजश्च जातं तदस्मै देवा उप सं नमन्तु ॥**

( अथर्व. १९।४१।१ )

'सर्व जनतेचें कल्याण करणाऱ्या आत्मज्ञानी ऋषींनी जें प्रारंभीं तप केलें, त्यायोगाने राष्ट्र निर्माण झालें व त्याने बल, ओज व सामर्थ्य प्राप्त झालें.' या मंत्राचा खरा अर्थ इतक्या विवेचनानंतर स्पष्टपणाने ध्यानीं येणें शक्य आहे. यावरून उघड होत आहे की, सर्व लोकांच्या हितासाठी स्वराज्याच्या चळवळींत आपणांस वाहून घेणें हें ऋषिऋण फेडण्याचें एक उत्तम साधन आहे. कारण ही चळवळ ऋषींनी फार प्राचीन काळीं केलेली होती. ती आपण न केली तर ऋषींचें ऋण आपणांवर चढत राहील; तें फेडण्यासाठी आपणहि तीच परंपरा चालू ठेवली पाहिजे.

आतापर्यंत जो आपण वेदमंत्रांचा विचार केला, त्यावरून एवढें सिद्ध झालें की––

( १ ) ग्रामसभा, राष्ट्रसमिति व मंत्रिपरिषद या तीन सभा राष्ट्रांत असत;
( २ ) त्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष हे राष्ट्राचा व्यवहार चालवीत असत;
( ३ ) अध्यक्षाचें नांव इन्द्र व उपाध्यक्षांचें नांव उपेन्द्र असे.

## इन्द्रपदासाठी स्पर्धा.

इन्द्रपद हें अढळ पद नसे, तर तें अल्पकालपुरतें असे. कित्येक लोक इन्द्रपदासाठी प्रयत्न करीत असत व त्यांच्या त्या प्रयत्नामुळे इन्द्राला आपलें इन्द्रपद हा घेईल कीं काय, असें वाटूं लागे, या कथा पुराणान्तरीं पुष्कळ आहेत.

त्या येथे देण्याचें कारण नाही. या इन्द्रपदाच्या अहमहमिकेमुळे ही गोष्ट निर्विवाद दिसते की, इन्द्रपद हें आंगच्या गुणांमुळे कोणासहि मिळणें शक्य होतें. या कालांत इन्द्रपद अढळ नसल्यामुळे इन्द्राला आपलें पद आपल्या हातांत रहावें व आपल्या पदावर दुसरा कोणीतरी येऊन बसूं नये, अशासाठी डोळयांत तेल घालून जपावें लागे. यानेच त्याचें सामर्थ्य वाढत असे व इन्द्रपदावर बसणारास आपलें सामर्थ्य सतत तेजस्वी ठेवावें लागे. पण पुढे इन्द्रपद स्थिर होऊन त्यांतूनच सध्याचें राजपद निर्माण झालें असावें, असेंहि वाटतें !

सो अरज्यत । ततो राजन्योऽभवत् ।
स विशः सबन्धूनन्नमन्नाद्यमभ्युदतिष्ठत् ।
स विशोऽनुव्यचलत् ।
तं सभा च समितिश्च सेना च सुरा चानुव्यचलन् ॥

( अथर्व० १५।८-९ )

‘ तो अधिक चमकूं लागला, तेव्हा तो मूर्धाभिषिक्त राजा झाला. त्याने प्रजांच्या व सर्व लोकांच्या खाण्यापिण्याची उत्तम व्यवस्था केली. जेव्हा तो लोकांच्या मतानुकूल चालूं लागला, तेव्हा त्याला ग्रामसभा, राष्ट्रसमिति, सेना व धनकोश हीं प्राप्त झालीं. ’

या मंत्रामध्ये लोकसभेचा अध्यक्षच अधिक तेजस्वी व अधिक लोकप्रिय झाल्यामुळे मूर्धाभिषिक्त राजन्य झाला असें म्हटलें आहे व तें योग्यच आहे, असें वाटतें. प्रजेच्या खाण्यापिण्याची व सुखसोयींची व्यवस्था जो राजा उत्तम प्रकारें करतो, त्याच्या हातांत लोकसभा, सैन्य व खजिना आपोआपच जातात व तोच त्यापुढे अनियंत्रित राजा बनतो. लोक त्यालाच आपल्या डोकीवर घेऊन नाचूं लागतात. हें होणें अगदी स्वाभाविकच आहे. लोकसभेचा अध्यक्षच अनियंत्रित राजा होतो; इतकेंच नव्हे, पण जर तो फार पराक्रमी असेल, तर राजपद त्याच्याच कुळांत स्थिरही होऊन जातें !

पुपद्य



निबंध

अशाच क्रमाने अस्थिर इन्द्रपद सुस्थिर झालें व ज्या लोकसभा स्वतंत्र होत्या व ज्यांच्या आधीन सैन्य व धनकोश होते, तें सगळें लोकसभेचें वैभव राजाच्या कलाप्रमाणे हालूं चालूं लागलें ! अशा प्रकारें वैराजस्थितींतून स्वराज्य व स्वराज्यांतून अनियंत्रित राजसत्ता निर्माण झाल्याचें वेदांच्या मंत्रांत दिसत आहे. शतपथब्राह्मणांतहि असेंच म्हटलें आहे–

> **ता अस्मा इष्टाः प्रीताः एतं सवमनुमन्यन्ते ।**
> **ताभिरनुमतः सूयते, यस्मै वै राजानो राज्यं**
> **अनुमन्यते स राजा भवति । न स यस्मै न ॥**

( श. ब्रा. ९।३।२।५ )

'सर्व प्रजा संतुष्ट झाल्या म्हणजे त्याच प्रजा आनंदाने राजाला आपल्या अनुमतीने निर्माण करतात, त्यांनी अनुमोदन केलेलाच राजा होतो; ज्याला राज्य द्यावें असें प्रजेच्या अनुमतीने ठरतें, तोच राजा होतो. ज्याला अशी अनुमति मिळत नाही, तो राजा होऊं शकत नाही.'

हें प्रथमारंभीं खरें असलें तरी पुढे हीच राजसत्ता जी अगदी प्रथमारंभीं प्रजेच्या अनुमतीवरच सर्वस्वीं अवलंबूल होती, तीच शेवटीं प्रजेच्या बोकांडीं बसूं लागली. अशा अनियंत्रित राजसत्तेबद्दल शेवटीं शतपथ–ब्राह्मणकारांनीच अगदी निराशेचे उद्गार काढले आहेत–

## अनियंत्रित राजा

> **राष्ट्रमेव विश्याहन्ति तस्माद्राष्ट्री विशं घातुकः ।**
> **विशमेव राष्ट्रायाद्यां करोति तस्माद्राष्ट्री विशमत्ति ।**

(श. ब्रा. १३।२।९)

'अनियंत्रित राजा हा प्रजेवर आघात करतो, म्हणून अनियंत्रित राजा प्रजेला घातक आहे. प्रजा ही अनियंत्रित राजाचें खाद्य होते, म्हणूनच अनियंत्रित राजा प्रजेला खातो.'

प्रजेने आपल्या अनुमतीने राजा निर्माण केला खरा, पण तोच पुढे प्रबळ होऊन प्रजेस खाऊं लागला. कुंपण फाजिल वाढलें म्हणजे तेंच शेताला खाऊं लागतें. तसाच प्रकार येथे झाल्याचा भास होत आहे.

येथपर्यंत केलेल्या विवेचनावरून वैदिक काळच्या ग्रामपंचायती, राष्ट्र-सभा, त्यांचे अध्यक्ष-उपाध्यक्ष, त्यांची कार्यक्षेत्रें, त्यांचे निवडणुकीचे नियम, लोकसभेचा लोकमान्य अध्यक्षच राजा बनून तो अनियंत्रित झाल्यावर कसा जाचक होई व शत्रुभूत राजाच्या विरुद्ध चळवळ करुन स्वराज्य-मिळवण्यासाठी कसे प्रयत्न केले जात, या गोष्टींचा चांगला बोध होतो.

## स्त्रियांची राष्ट्रीय चळवळ

'खेल' राजाचें शत्रूबरोबर युद्ध चाललें होतें. त्यांत खेल राजाचा पराभव होऊं लागला, तेव्हा '**विश्पला**' नामक एका कुमारिकेने सैन्याचें पुढारीपण घेतलें व शत्रूबरोबर भयंकर युद्ध केलें. त्यांत विश्पलेची जांघ तुटली. त्या वेळीं राजवैद्यांनी लोखंडाची जांघ करून तिला बसविली व तिने पुनः युद्ध करून, शत्रूचा पराभव करून, विजय संपादन केला.

**जंघां विश्पलाया अधत्तं** ॥ (ऋ० १।११८।८)

जशी 'जोन ऑफ आर्क' युरोपमध्ये, त्याहीपेक्षा विश्पला ही वैदिक काळांत चमकत आहे. स्त्रियांनी राष्ट्रावर आपत्ति आली असतां युद्ध करण्या-साठी पुढे व्हावें व शत्रूचा पराभव करावा, हें योग्यच आहे; पण असें मानलें असतां **स्त्रियांनासुद्धा किती वीरवृत्तीचें शिक्षण देणें योग्य आहे**' तें सहज ध्यानीं येणें शक्य आहे. स्त्रियांना जर वीरवृत्तीची वाढ करणारे शिक्षण दिलें नाही व त्यांस सूर्यही दिसूं नये असें गोषांत ठेवलें, तर त्यांच्यां-तून '**विश्पला**' कशा बरें निघणार? हा विचार मनांत आला म्हणजे विश्पलेच्या काळच्या वैदिक शिक्षणक्रमाची कांही तरी कल्पना येणें शक्य आहे.

प्रसंग येतांच एक कुमारिका लढते व जय मिळविते, ही गोष्ट सहजासहजीं घडणारी नाही. शस्त्रास्त्रें वापरण्याची माहिती, सैन्याची हालचाल करण्याची प्रवीणता, शत्रूचें बलाबल ठरवण्याची कुशलता, शीतोष्ण सहन करण्याची शक्ति, हें सर्व असल्यावाचून एखादी मुलगी लढाईंत गेली तर ती काय करूं शकणार ? यावरून विश्पलेच्या वेळीं पुरुषांना व स्त्रियांना आवश्यक तितकें युद्धशिक्षण मिळत होतें, असें दिसतें.

मौंजीबंधनांतील **दण्डधारण**, यज्ञांतील **स्फ्य-धारण** व ब्रह्मचर्याश्रमांतील **परशुधारण** या पद्धतींवरूनहि वरील अनुमानास बळकटी येते. मौंजीबंधनांतील **मेखला-बंधन**, म्ह० कमर कसून तयार होण्याची पद्धति हेंच सुचवीत आहे की, हे सर्व विधि मूळचे **राष्ट्रीय स्वयंसेवक**-दलामध्ये प्रविष्ट होण्याचे आहेत. या वेळीं मुलांचें व मुलींचें असें दोघांचेंहि उपनयन होत होतें. पूर्वीच्या उपनयनाची कल्पना येण्यासाठी गणपतीच्या उपनयनाचें उदाहरण देतां येईल. कश्यप ऋषींचा पुत्र **गुणेश** हा पहिला गणेशावतार होय. याच्या उपनयनामधील भिकाळींत त्यास सर्व शस्त्रास्त्रें व त्यांच्या प्रयोगाचें ज्ञान मिळालें असून तें सर्व तेथील ऋषींस संमत झालेलें होतें.( गणेश-पुराण पहा.) यावरून मेखलाबंधन हा संस्कार वैदिक काळच्या आर्य-स्वयंसेवकदलाचा प्रवेश-संस्कार असावा असें वाटतें. वेदांमध्ये याविषयी असें म्हटलें आहे—

## कमर कसून तयारी !

**मृत्योरहं ब्रह्मचारी यदस्मि निर्याचन् भूतात्पुरुषं यमाय ।**
**तमहं ब्रह्मणा तपसा श्रमेणानयैनं मेखलाया सिनामि ॥**

( अथर्व० ६।१३३।३ )

' मी मृत्यूला वाहिलेला ब्रह्मचारी आहें. म्हणून मी या लोकांतून एक पुरुष मृत्यूला समर्पित करण्यासाठी मागत आहें. जो पुरुष या दीक्षेसाठी येईल, त्याला ज्ञान, तप व फार श्रम करावे लागतील; म्हणून ही मेखला मी त्याच्या

कमरेला बांधीत आहें. '

या मंत्रांतील वाक्यें काळजीपूर्वक पाहण्यासारखीं आहेत—

( १ ) ( **अहं मृत्योः ब्रह्मचारी** ) मी मृत्यूला आत्मसर्वस्वाचें अर्पण करणारा ब्रह्मचारी आहें. मरणाच्या तयारीने या स्वयंसेवक-आश्रमांत प्रविष्ट झालों आहें.

( २ ) माझ्यासारखाच आणखी एक ( **पुरुषं यमाय** ) मनुष्य मृत्यूला कवटाळण्यास तयार असलेला असा आपल्या समाजांतून या संघांत आणावा असें मी ( **याचन्** ) इच्छीत आहें.

( ३ ) या आश्रमांत ( **ब्रह्म** ) ज्ञान मिळविणें, ( **तपः** ) तपस्वी जीवन स्वीकारणें व ( **श्रमः** ) परिश्रम करणें आवश्यक असतें.

( ४ ) हें करतां यावें म्हणून मी या नवीन प्रविष्ट झालेल्या तरुणाच्या कमरेला ( **मेखलया सिनामि** ) मेखला बांधीत आहें.

हे सर्व विचार स्वयंसेवकसंघांत प्रविष्ट झालेल्याचेच आहेत असें वाटतें. असो. अशा रीतीने ही उपनयनाच्या वेळीं स्वधर्म-संरक्षणाची दीक्षा मिळत असे असें दिसतें. पण ही दीक्षा आता आपल्या या पवित्र संस्कारांतून पूर्ण-पणाने लोपून गेली आहे !

अशा संस्कारांनी संस्कृत झालेले तरुण व वृद्ध ऋषि आत्रि ऋषीच्या अनुयायां-मध्ये असतील व ते पूर्वी दिल्याप्रमाणे **बहुपाय्य स्वराज्यासाठी आमर-णान्त यत्नही करीत असतील**, हें अगदी स्वाभाविक आहे. या विचार-सरणीचा अंगिकार केला असतां आपण अगदी स्वतंत्र व निराळ्याच अशा वैदिक वातावरणांत जाऊन पोचतों व तेथील शुद्ध व उच्च जीवनाचें आपणांस ज्ञान होऊन त्या योगाने नवीनच विचार मनांत येऊं लागतात. याच विचार-सरणीच्या पूर्णतेसाठी आपणास या ठिकाणी सर्वांचा उपास्य असा जो जगद्वीज नारायण देव त्याच्या स्वरूपाचेंहि मनन करणें आवश्यक आहे. तें असें—

## उपास्य नारायण

**सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्षः सहस्रपात् ॥ १ ॥**
**यत्पुरुषं व्यदधुः कतिधा व्यकल्पयन् ।**
**मुखं किमस्य कौ बाहू का ऊरू पादा उच्येते ॥ ११ ॥**
**ब्राह्मणोऽस्य मुखमासीद् बाहू राजन्यः कृतः ।**
**ऊरू तदस्य यद्वैश्यः पद्भ्यां शूद्रो अजायत ॥ १२ ॥**
**(ऋ० १० । ९०)**

‘ ( जगद्बीज नारायण स्वरूपी जो ) एक पुरुष आहे त्यास हजारो मस्तकें, हजारो डोळे व हजारो पाय आहेत. ज्या पुरुषाचें हें वर्णन आहे त्याचें तोंड, त्याचे बाहु, त्याच्या जांघा व त्याचे पाय कोणते आहेत बरें ? ब्राह्मण हे त्याचीं मुखें, क्षत्रिय हे त्याचे बाहू, वैश्य हे त्याच्या जांघा व शूद्र हे त्याचे पाय होत. ’

याप्रमाणें ब्राह्मण-क्षत्रिय-वैश्य-शूद्र या लोकांचा समुदाय हेंच नारायणाचें शरीर आहे. या चार वर्णामध्येच पंचजनांचा अन्तर्भाव आहे असें समजलें असतां जनताजनार्दन हाच उपास्य नारायण आहे, अशी खात्री होते. जनतेचें संघटित रूप हेंच जगद्बीज नारायणाचें सगुण शरीर होय. मनुष्यांनी सेवा करण्याजोगें सगुण असें हें नारायणाचें प्रत्यक्ष रूप आहे. तें जसें वैदिक काळीं होतें तसेंच तें आजहि आहे.

हा आशय मनांत घेऊन अत्रि ऋषीला जें ‘ **पांचजन्य** ’ ( म्ह० पंच जनाचें हित करणारा ) असें म्हटलें आहे त्याचा अर्थ सहज समजूं शकेल. **अत्रि ऋषि आपल्या अनुयायांसह नारायणाच्या या पंचजन-रूपी सगुणरूपाची सेवा करीत होते.** या पंचजनामध्ये कोणीहि दुःखी-कष्टी राहूं नये. या जनतेमध्ये जे दुःखी असतील त्यांस दुःख होऊं नये, यासाठी आपणांस जें काय करतां येईल, तें हे ऋषि करीत असत. हीच

नारायणाचा सेवा, हीच विराट् पुरुषाची उपासना व हीच जनताजनार्दनाची पूजा होय. ही स्वकर्माने करावयाची असते.

**स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः ॥** गी. १८।४६

ज्ञानी लोकांनी ज्ञानप्रसार करून, क्षत्रियांनी जनतेचें संरक्षण करून, वैश्यांनी धान्यसंवर्धन, गोरक्षण व पशुरक्षण करून, शूद्रांनी कारागिरीचीं कामें करून अथवा वरील कार्यकर्त्यांस सहाय्य करून व निषादांनी वनांचें उत्तम संरक्षण करून ही जगद्बीज नारायणाची सेवा करावयाची आहे.

## यज्ञ

हेंच प्रारंभींचें यज्ञाचें रूप होय. ऋषिलोक जनतेचें कल्याण व्हावें म्हणून जे यज्ञ करीत असत, ते पहिले यज्ञ हेच होत. आजही जनता हेंच जनार्दनाचें स्वरूप आहे, असें समजून त्या सगुणस्वरूपाची उपासना किंवा सेवा करणें अत्यंत अगत्याचें आहे. ही प्रत्यक्ष नारायणउपासना सोडून अप्रत्यक्षाच्या नादीं लागण्यानेच आमचें नुकसानच झालें आहे.

अनेक वैदिक यज्ञ हे याच जनतास्वरूपी नारायणाची–विराट् पुरुषाची–उपासना, सेवा किंवा भक्ति करण्यासाठी केले जात असत. या सर्व यज्ञांचें विवरण करणे हें त्या काळची सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक समजूत घेण्यासाठी अत्यंत आवश्यक असले तरी तसें करण्यासाठी आवश्यक असलेला वेळ आज आपणापाशीं नाही. म्हणून या सर्व यज्ञांचें विवरण करणें हें दुसऱ्या एखाद्या प्रसंगासाठी ठेऊन त्यांतील मुख्य राष्ट्रीय वृत्तीचा जेवढा भाग आहे, तेवढाच विशेष विचारासाठी या ठिकाणीं घेण्याचें योजलें आहे.

## यज्ञाग्नि

यज्ञांतील अग्नि हा '**द्रविणोदा, धनदा, धनंजय व राष्ट्र**' आहे, असें अनेक मंत्रांत सांगितलें आहे. पहा—

निबंध १६०८ ... ३५४२

अग्ने अच्छा वदेह नः प्रत्यङ् नः सुमना भव ।
प्र नो यच्छ वनस्पते धनदा असि नस्त्वम् ॥
(ऋ० १०।१४१।१)

उत ब्रुवन्तु जन्तव उदग्निर्वृत्रहाजनि ।
धनंजयो रणे रणे ॥ (ऋ० १।७४।३)
द्रविणोदा वीरवतीमिषं नो ।
द्रविणोदा रासते दीर्घमायुः ॥ (ऋ० १।९६।८)
पर्यावद् राष्ट्रं तद्वाम्यायन् । (ऋ० १०।१२४।४)

या मंत्रांत अग्नि, यज्ञाग्नि हा धन देतो, युद्धांत जय मिळवून धन देतो, वीरतायुक्त अन्न व वीरांचें जीवन देतो, राष्ट्राचें रक्षण करतो ( राष्ट्रं अवामि ) असे यज्ञाग्नीचे गुण वर्णन केले आहेत. यज्ञांतील अग्नि हें सर्व कसें करतो. तें आता आपणास पाहिलें पाहिजे. वैदिक काळच्या लोकांचें सर्व जीवन यज्ञावर केन्द्रित झालेलें होतें, हें निर्विवाद आहे. ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्रादिकांचे सर्व व्यवहार यज्ञावर केन्द्रित झालेले होते. हें दाखविण्यासाठी म्हटलें आहे की—

इयं वेदिः परो अन्तः पृथिव्याः ।
अयं यज्ञो भुवनस्य नाभिः ॥ (वा०यजु०२३।६२)

ही यज्ञवेदी म्हणजे पृथ्वीचा अन्त असून हा यज्ञ भुवनाचा केन्द्र आहे. केन्द्राला अनुलक्षूनच सर्व हालचाली होत असतात. ज्या जातीचा जो केन्द्र असतो, त्याच्या संरक्षणासाठीच त्या जातीचे पंचप्राण खर्च होत असतात. सध्या युद्धामध्ये आपल्या जातीच्या किंवा राष्ट्राच्या निशाणाच्या संरक्षणासाठी सर्व लोक मरण्यास तयार होत असतात. वैदिक काळीं यज्ञ-रक्षणासाठी अशींच युद्धें केलीं जात असत व ते वैदिक काळचे लोक आत्मसमर्पण करून यज्ञाग्नीला अबाधित ठेवीत असत.

# यज्ञासाठी लढाई!

विश्वामित्र रावणाच्या छायेखाली असलेल्या दक्षिणेंकडच्या प्रदेशांत जातो, तेथे आपला यज्ञमंडप घालून यज्ञ सुरू करतो व त्या यज्ञासाठी आर्य राजांचे तरुण वीर जाऊन लढतात. रावणाच्या सैन्याचा पाडाव करतात व आर्यांच्या यज्ञाग्नीला अजिंक्य करण्यासाठी तरुण आत्मसमर्पण करतात. यांतील मर्म पाहण्यासारखें आहे. विश्वामित्राला आर्यावर्तांत यज्ञासाठी सुरक्षित भूमि मिळत नव्हती, असें नाही; पण आर्यांनी आपल्या ताब्यांत घेतलेल्या प्रदेशांत यज्ञ केला, तर त्या यज्ञाचें राजकीय महत्त्व तें काय ? यासाठी **शत्रूच्या प्रदेशांत जावें, तेथे यज्ञ करण्यास प्रारंभ करावा, मेखलाधारी तरुणांस उपनयन करून घेऊन बरोबर बाळगावें, राक्षसांनी हल्ला केला म्हणजे त्यांच्या नांवाने गवगवा करून आर्य क्षत्रियांस त्यांच्या विरुद्ध उठवावें व निर्विघ्नपणाने यथासांग यज्ञ होईल, इतकी शांततेची परिस्थिति होईपर्यंत म्हणजे तो सर्व प्रदेश आर्यराजांच्या ताब्यांत पूर्णपणाने येईपर्यंत व तेथील शत्रु पूर्णपणाने हाकालले जाईपर्यंत आर्यक्षत्रियांकडून युद्ध करवावें,** हा या यज्ञांतील राजकीय भाग आजहि सर्वांस दिसण्यासारखा आहे.

हा भाग पाहिला नाही व समजून घेतला नाही, तर अग्नि हा धन, द्रविण, वीरतायुक्त अन्न, यश व राष्ट्र देतो, तो कसा? हें कधीहि समजणार नाही. आजचे याजक हे सुरक्षित ठिकाणीं बसून यज्ञ करतात. कारण त्यांस विश्वामित्र–वामदेवांच्या या वीरवृत्तीची मुळीच जाणीव नाही. **विश्वामित्राने अयोध्येंत सुरक्षित ठिकाणीं बसून यज्ञ न करतां राक्षसांनी व्यापलेल्या दक्षिण प्रदेशांत जाऊन यज्ञास प्रारंभ कां केला ?** इतर ऋषि दक्षिणेंत बसून रामाच्या पूर्वीपासून काय

करीत होते? ते आपल्या जवळ हजारो मेखलाधारी तरुणांना घेऊन राहत व राक्षसांच्या मुलखांत राक्षसांचे अडथळे होत असतांहि तेथून आपले आश्रम कां हालवीत नव्हते? शत्रूंनी आक्रमिलेल्या प्रदेशांतच जाऊन यज्ञ कां करावे? यांतील मर्म पहावें.

या दृष्टीने विचार केला असतां असें वाटूं लागेल की, आज जर कोणास यज्ञ करावयाचे असतील तर ते त्यांनी आपल्या आर्य देशाच्या सरहद्दीच्या पलीकडे जाऊन तेथे केले पाहिजेत व जर तद्देशीयांनी यज्ञास विघ्न केलें तर आपल्या संस्थानांतील राजा–महाराजांची सैन्यें, तेथे नेऊन त्या यज्ञाला विरोध करणारांचा पराभव करून आपला यज्ञाचा झेंडा तेथे अबाधित फडकत ठेवला पाहिजे.

हा यज्ञाचा राजकीय भाग फारच महत्वाचा आहे व तो वैदिक कालापासून रामायणाच्या कालापर्यंत फारच यशस्वी स्वरूपांत असलेला आपणास दिसत आहे. पुढे त्यांतील ही वीरता समूळ नष्ट झाली व आता तर नुसतें हवनच शिल्लक राहिलें आहे! वैदिक काळचा यज्ञ व आजचा यज्ञ यांची अशी तुलना सर्वांनी करावी.

**वैदिक कालांतील यज्ञयाग हे आपलें राष्ट्रीय बल वाढवण्यास अशा प्रकारें कारणीभूत होत असत.** असो. हा विचार चिकित्सावा तेवढा थोडा आहे; म्हणून याला आता येथेच आवरत घेणें योग्य आहे.

## तात्पर्य

या निबंधामध्ये वैदिक मंत्रांत राष्ट्रविद्या कशा रीतीने आहे. तें दाख-वून यज्ञ हा राष्ट्रीय वीरवृत्तीचा केन्द्र कसा होता, तें दाखवलें वेद हे नुसते होमहवन किंवा सध्याच्या समजुतीचे य

साठीच आहेत असें समजणें चुकीचें आहे. जर सर्व वेद हे यज्ञपरक आहेत असेंच मानावयाचें असेल तर 'यज्ञ' शब्दाचा अर्थ भगवद्गीतेंत केला आहे तसा तरी अत्यंत व्यापक करावा लागेल. कांहीहि असलें तरी वेदांचा अर्थ अशा रीतीने पाहूं लागलें असतां आपणास आजच्या मानवी व्यवहारांत उपयोगी पडणारे अनेक राजकीय, सामाजिक, व्यावहारिक उपयोगाचे महत्वपूर्ण संदेश सापडणें शक्य आहे. ही गोष्ट राष्ट्रीय संदेश देणारे कांही मंत्र उलगडून येथें दाखविली आहे.

इतर अन्य विषयांचा ऊहापोह करावयाचा असेल तर त्यासाठीं असे अनेक प्रबंध तयार करावे लागतील. असो यावरून वेदमंत्रांचा अभ्यास सर्व बाजूंना करून काय बोध मिळतो तो जनतेस सांगणें आजच्या संस्कृतज्ञ धार्मिक विचारकांचें कर्तव्य आहे. तें करण्यास त्यांनी पुढे यावें, अशी त्यांस विनंती आहे.

५५९५

REFBK-0005565

आजच्या व्यवहारांत

# वैदिक ज्ञानाची उपयुक्तता.

( चवथा निबंध )

वेदमंत्रांतील उपदेश सध्याच्या काळांतहि कसा उपयोगी आहे, तें आपणांस पहावयाचें असेल तर ' वैदिक ज्ञानाची उपयुक्तता ' हें पुस्तक घ्या व वाचा. किं० ८- एक आणा.

# सनातन धर्माचें स्वरूप.

पहिला निबंध- १ 'धर्माची व्याख्या'
दुसरा निबंध- २ धर्माचें साध्य व ३ धर्माचा साधनमार्ग
तिसरा निबंध- ४ धर्माचे कर्माचार व
५ धार्मिक समाजाचें स्वरूप

तीन भाग एकत्र किं० ८५ पांच आणे.

या तीन निबंधांमध्ये वरील ५ विषयांची मुख्यतः तात्विक चर्चा केलेली आहे. सनातन धर्माच्या मूलभूत तत्त्वज्ञानाचीं मुख्य सूत्रें सांगून त्यांच्या आधाराने सर्व कर्माचार कसे प्रवृत्त झाले ? त्या कर्माचारांचें मुख्य ध्येय काय ? तें कसें साध्य होतें ? सज्ञानांनी व अज्ञानांनी न चुकतां आपला मार्ग कसा आक्रमण करावा ? इत्यादि सर्व मुख्य विषयांचा तात्त्विक दृष्टिने ऊहापोह यांत केलेला आहे.

व्यवस्थापक- स्वाध्याय-मंडल, औंध (जि० स

# पुरुषार्थ–ग्रंथ–माला.

| | | मूल्य | ट. खर्च. |
|---|---|---|---|
| १ | संध्या ( उपासना. ) | ०–१–० | ८– |
| २ | सूर्यास नमस्कार | ०–४–० | ८– |
| ३ | मनुष्याचें आयुष्य | ०–३–० | ८– |
| ४ | स्वधर्माची ओळख | ०–४–० | ८– |
| ५ | वैदिक संस्कृतीचें स्वरूप | ०–४–० | ८– |
| ६ | सूर्य–भेदन–व्यायाम | ०–६–० | ८= |
| ७–१० | आरोग्यासाठी योगसाधन ( ४ भाग ) | २–०–० | .।≡ |
| ११ | नमस्कार–चित्रपट | ०–२–० | ८– |
| १२ | आसन–चित्रपट | ०–३–० | ८– |
| १३ | एकादशीचा उपवास | ०–३–० | ८– |
| १४ | पौराणिक गोष्टींचा उलगडा | ०–८–० | ८= |
| १५ | ईश उपनिषद् | ०–८–० | ८= |
| १६ | संस्कृत–स्वयं–शिक्षक पूर्ण २४ भाग | ६–८–० | .।।।. |
| | ,, ,, पहिले १२ भाग | ३–८–० | .।।. |
| १७ | अनासक्तियोग ( म .गांधी ) | ०–३–० | ८– |
| १८ | प्राचीन आर्यांचे राजकीय विचार | ०–१०–० | ८= |
| १९ | उत्कर्षाचा राजमार्ग (तर्क.कोकजे) | ०–६–० | ८= |
| २० | सांख्य कारिकांचें समवृत्त भाषांतर | ०–४–० | ८– |

स्वाध्याय–मंडल, औंध ( जि॰ सातारा. )

---

मुद्रक आणि प्रकाशक श्री॰ दा॰ सातवळेकर,
भारत–मुद्रणालय, औंध ( जि॰ सातारा )